# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएल च्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात मतदान जागृती कार्यक्रम

➢ परिवहन महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली मतदान करण्याची प्रतिज्ञा

लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून आपला सहभाग नोंदवावा यासाठी मा. भारत निवडणूक आयोग व मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांनी मतदान जागृती कार्यक्रम घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरून पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत व सर्व डेपोंमध्ये दि. २८ मार्च २०२४ रोजी मतदान जागृती कार्यक्रमांतर्गत मतदान प्रतिज्ञा घेण्यात आली.

परिवहन महामंडळाच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. संजय कोलते, सहव्यवस्थापकीय संचालक मा. श्री. नितीन नार्वेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. प्रज्ञा पोतदार-पवार यांच्यासह सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांनी मतदानाचा हक्क बजाविण्याचा निर्धार व्यक्त करून मतदानाची प्रतिज्ञा घेतली.

याप्रसंगी हवेली तालुका तहसिलदार मा. श्री. सूर्यकांत येवले व कसबा विधानसभा मतदारसंघातील मतदान जागृती कार्यक्रमाची संपूर्ण टीम उपस्थित होती.

---

"आपला मतदानाचा हक्क बजावून आपण सर्वांनी लोकशाहीच्या महोत्सवामध्ये सहभागी होऊया. तसेच आपले नातेवाईक, मित्रमंडळी यांचे प्रबोधन करून जास्तीत जास्त मतदार मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवतील यासाठी प्रयत्न करूया."

--- मा. डॉ. संजय कोलते, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल.

---

दि. २८/०३/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---